# नियमित दिवाणी मुकदमा नंबर १३०९/२०२० मधील नि.२० वरील आदेश

**१.** अर्ज व म्हणणे वाचले.

**२.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला

**३.** प्रतिवादी क्र. १ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांना दाव्यासंबंधी आवश्यक ती कागदपत्रे व पूर्वी झालेल्या लेखाची माहिती वेळेत मिळू न शकल्याने मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे, त्यांचेविरुध्द दि.२२.०८.२०१९ रोजी 'विना कैफियतीचा' आदेश झाला आहे. वादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जाचे पृष्ठयर्थ ॲफिडेव्हीट सादर करुन ही कथने शपथेवर केली आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांनी दिलेले हे कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा खरेदीपत्रांनुसार वाद मिळकतीचे वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणेसाठी त्यांना कैफियत व म्हणणे सादर करणेस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. याकरीता प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द करणे योग्य व उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः-

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द दि.२२.०८.२०१९ रोजी झालेला 'विना कैफियतीचा' आदेश रद्द करणेत येत आहे व त्यांची कैफियत अभिलेखात दाखल करुन घेणेत येत आहे.

-

Sd/-

**दिनांक १७/१२/२०२१** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण विटा.** **तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS No 1309 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Typist : D.R.Kamble
Court Name: 3rd Jt. Civil & Criminal Court,Vita. Dist. Sangli.
Date of decision :17/12/2021
Order signed by P.O.on : 17/12/2021
Order uploaded on :17/12/2021